**: – नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६०/२०१७ मधील नि. ९२ खालील आदेश –:**

(आनंद नारायण सावंत व.५ विरुध्द रघुनाथ महादेव मोर्ये व.)

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १अ पार्वती रघुनाथ मोर्ये हया दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मयत झाल्या असून त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांचे अर्जातील कथन असे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. १अ पार्वती रघुनाथ मोर्ये हया दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मयत झाल्या असून तिच्या मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांचे आत तिचे वारस याकामी रेकॉर्डवर आणणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी क्र. १अ हिचा दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मृत्यु झाल्याच्या नंतर दिनांक २७/१२/२०२४ च्या कालावधीपर्यंत तिच्या वारसांनी तिच्या मृत्युची नोंद संबंधीत ग्रामपंचायतीच्या मृत्युनोंद रजिस्टरला केलेली नव्हती. त्यामुळे त्या मुदतीत तिचे वारस याकामी मुदतीत रेकॉर्डवर दाखल करता आले नाहीत. वारसांनी जी मृत्यूच्या नोंदीची वर्दी ग्रामपंचायतीकडे दिली होती त्यावरुन त्या नोंदीच्या उता–याची संबंधीत ग्रामपंचातीने वादीना दिनांक १६/०१/२०२५ रोजी सहीसुद प्रत पुरविली. त्याआधारे वादीने मयत प्रतिवादी क्र. १अ चे वारस या दाव्याचे कामी रेकॉर्डवर आणण्यासाठी सदर अर्ज दाखल केला आहे. सदर मयत प्रतिवादी क्र. १अ चे वारस या दाव्याचे कामी रेकॉर्डवर आणण्यास जवळपास जो २७ दिवसांचा विलंब झालेला आहे तो विलंब हा वादीच्या चुकीमुळे किंवा त्यांच्या हलगर्जीपणामुळे झालेला नाही तर वर नमुद कारणामुळे झाला आहे. मयत प्रतिवादी क्र. १अ हिचे वारस याकामी रेकॉर्डवर दाखल करुन न घेतल्यास वादींचे कायदेशीर न्याय हक्कांवर विपरित परिणाम होऊन त्यांचे पैशाचे रुपाने कधीही भरुन न येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र.१अ चे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ करण्यात यावी अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ब ने सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन प्रतिवादी क्र. १अ चे मृत्यूची नोंद दिनांक २७/१२/२०२४ रोजी दाखल केलेली आहे. अर्जात विलंबाचे नमूद केलेले कारण खोडसाळ आहे. सबब, वादीचा विलंब माफीचा अर्ज फेटाळणेत यावा. अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास वादीवर रु. १०००/– कॉस्ट बसवून

अर्ज मंजुर करणेत यावा.

०४. मुदतीचा कायदा आर्टीकल १२० नुसार दाव्यातील एखादा पक्षकार मयत झाल्यास मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत मयत पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक असते. त्याचबरोबर अशा मयत पक्षकाराबाबत दावा उपशमित झाल्यास आर्टीकल १२१ नुसार ६० दिवसांच्या आत तो आदेश रद्द करुन घेणे आवश्यक आहे.

०५. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १अ पार्वती रघुनाथ मोर्ये हया दिनांक ०९/१०/२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. त्यामुळे मृत्यू तारखेपासून पुढे ९० दिवसांचे आत त्यांचे कायदेशीर प्रतिनिधीबाबत दाव्यामध्ये तजवीज करणे आवश्यक होते. परंतु, वारस दाखल करण्यास त्यांना विलंब झालेला आहे. प्रस्तुतचा दावा, हक्कस्थापनेसाठी, ठराव होऊन मिळणेसाठी तसेच, कायम ताकिदीकरीता दाखल केला आहे. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादीचे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. सबब सदरचा विलंब माफ करणेकरीता सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. परंतु वादी यांनी सदरचा अर्ज विलंबाने दिलेला असल्यामुळे त्याच्यावर योग्य तो खर्च लावणे आवश्यक आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–: <u>आदेश</u> :–**

१. सदरचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रुपये २००/– (रुपये दोनशे मात्र) इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर मयत प्रतिवादी क्र. १अ यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2025.03.10 18:44:23 +0530

दिनांक– ०५/०३/२०२५

(प.रा.ढोरे )
सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कुडाळ.